**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 02.11.2025** **वार- रविवार**

---

**मॅरेथॉन**

लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार पटेल यांच्या 150 व्या जयंती निमित्तानं संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीनं आयोजित 'पुणे रन फॉर युनिटी', महामॅरेथॉनचं आयोजन आज केलं होतं. या अंतर्गत 21 किलोमीटर शर्यतीत पुरुष गटात मनीष राजपूत आणि महिला गटात अंकिता गावीत यांनी अव्वल क्रमांक मिळवला.

स. प. महाविद्यालयातून या महामॅरेथॉनला सुरुवात झाली. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तसंच पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या खासदार क्रीडा महोत्सवाला आजपासून महा मॅरेथॉन नं सुरुवात झाली. हा महोत्सव 16 नोव्हेंबर पर्यंत चालणार असून यामध्ये एकूण 35 प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पुणे रन फॉर युनिटी'मध्ये आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह 20 हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले होते. केनिया, इथिओपिया इत्यादी देशांतील आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटूंचा सहभाग होता.

**मिशन मौसम**

भविष्यात क्लाउड फिजिक्स अर्थात ढगांच्या विज्ञान संशोधनासाठी पुण्यात सेंटर ऑफ एक्सलन्स उभं करणार असल्याची माहिती केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉक्टर एम रविचंद्रन यांनी आज पुण्यात सांगितली. भारतीय उष्णप्रदेशिय हवामानशास्त्र संस्थेच्या वतीनं हवामान बदला विषयी अकराव्या जागतिक हवामान परिषदेच आयोजन 3 ते 7 नोव्हेंबर दरम्यान करण्यात आलं आहे त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मिशन मौसम अभियान हाती घेतले असून 2047, पर्यंत

क्लायमेट स्मार्ट नेशन बनवण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. यासाठी हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणे, या क्षेत्रासाठी देशभरात उपग्रह उभे करणे, जागतिक दर्जाचं तंत्रज्ञान भारतात विकसित करणे यासाठी केंद्रीय मंत्रालय प्रयत्नशील आहे.

या अंतर्गत पुढील पाच दिवस चालणाऱ्या या परिषदेत जगभरातले शास्त्रज्ञ सहभागी होणार असून हवामान शास्त्र बदलाचा अभ्यास, संशोधन, विकसित तंत्रज्ञान याविषयी चर्चासत्रात भाग घेणार आहेत.

**पुणे विद्यापीठ/जर्मनी**

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रत आग्रेसर राहण्याच्या उद्देशानं एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागानं जर्मनीच्या फर्टवान्जेन विद्यापीठा बरोबर एक महत्वपूर्ण सामंजस्य करार केला आहे.
या प्रसंगी प्रसिद्ध जर्मन पर्यावरण रसायनशास्त्रज्ञ आणि "जलतरण शास्त्रज्ञ", प्रा. डॉ. अँड्रियास फाथ यांचं व्याख्यान झालं.

**आयुक्त**

पुणे महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज देवाची उरुळी कचरा डेपो परिसराला भेट देऊन तिथल्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. या भेटी दरम्यान त्यांनी पुणे मनपाच्या बायोमायनिंग प्रकल्प तसंच 500 मेट्रिक टन क्षमतेच्या मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला. त्यांनी पुढील काळात महानगरपालिकेची कचरा प्रक्रिया क्षमता वाढवण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या.

**संजीवन समाधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी दिन सोहळ्याला आळंदीत देऊळवाड्याच्या गुरू हैबत बाबांच्या पायरी पूजनानं 12 नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या सोहळ्यातील कार्तिक एकादशीची मुख्य पहाट पूजा 15 नोव्हेंबर तर माउलींचा संजीवन समाधी दिन सोहळा 17 नोव्हेंबर ला  होणार आहे.

**सशुल्क पार्किंग**

पुणे महापालिकेतर्फे जंगली महाराज रस्ता, गोखले रस्ता, बालेवाडी हायस्ट्रीट, लक्ष्मी रस्ता आणि बिबवेवाडीतील मुख्य रस्त्यावर सशुल्क वाहनतळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या निर्णयापूर्वी इमारतींमधील राखीव पार्किंग जागा नागरिकांसाठी उपलब्ध

करून देण्याची मागणी क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्याकडे केली आहे.

## अपघात

कोरेगाव पार्क परिसरात आज पहाटे बंडगार्डन मेट्रो स्थानकाजवळ अपघात झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला तर गाडीतील एक जण गंभीर जखमी झाला. गाडीचा हँड ब्रेक ओढल्यानं गाडीचं नियंत्रण सुटून गाडी मेट्रो स्थानकाच्या खांबाला धडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## कृषी

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह कर्नाटक ,गुजरात ,तामिळनाडू ,उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्यानं काकडीच्या भावात वाढ तर हिरव्या मिरचीच्या भावात घसरण झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत पालेभाज्यांचे भाव आणि मागणी टिकून असल्यानं भाव स्थिर आहेत. कोथिंबिरीच्या दीड लाख तर मेथीच्या पन्नास हजार जुड्यांची आवक झाली. लग्नसराई सुरू होणार असून फुल बाजारात शोभिवंत फुलांना मागणी वाढली असून सुट्ट्या फुलांच्या भावात मात्र घट झाली आहे.

## हवामान

पुणे आणि परिसरात आज काही ठिकाणी हलका पाऊस पडला. कमाल तापमान 30 तर किमान तापमान 21 पूर्णांक 08 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**